प्रेसनोट                    दि.१३/०४/२०१९

# सिंहगड पोलिस स्टेशन

## कम्युनिटी पोलीसींगचे अनुषंगाने हॉटेल मालक व चालक यांची बैठक घेवुन जनजागृती

दि.१२/०४/२०१९ रोजी १७.०० वा. ते १८.०० वा. चे दरम्यान वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सिहंगडरोड पोलीस स्टेशन, पुणे श्री दुर्योधन पवार व स्टाफ असे मिळून सिंहगडरोड पोलीस स्टेशन येथे हॉटेल मालक व चालक यांची बैठक आयोजीत केली. सदर मिटींगमध्ये पुणे पोलीस आयुक्तालयाकडून कम्युनिटीं पोलीसींग संदर्भात एकुण १४ ॲप/योजना कार्यान्वीत असून त्या संदर्भात उपस्थित हॉटेल मालक व चालक यांना माहीती सांगण्यात आली. तसेच आगामी लोकसभा २०१९ च्या अनुषंगाने सदर बैठकीमध्ये आचारसंहीतेच्या नियमांचे पालन करावे तसेच योग्य त्या परवानगी घेणेबाबत हॉटेल मालक व चालक यांना सुचना व मार्गदर्शन करण्यात आले. अनाधिकृत हॉटेल व्यवसायकांनी परवाना घेवुन व्यवसाय करावा. हॉटेल व्यवसायिकांनी वेळेचे पालन करावे. हॉटेल मध्ये भांडणे अथवा काही अडचण उदभवल्यास त्वरीत सिंहगडरोड पो.स्टे. अथवा १०० नंबरवर कॉल करुन पोलीस कंट्रोल रुम येथे कळवावे. तसेच सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. आपल्या आस्थापनेतील कामगारांची पोलीस स्टेशनमार्फतीने चारित्र्य पडताळणी करावी. आपल्या आस्थापनेत किंवा आजुबाजूस कोणी संशयीत व्यक्ती आढळल्यास ताबडतोब पोलीसांना कळविण्यात यावे. त्यांना त्याबाबत योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले. सदर मिटींगला ३५ ते ४० हॉटेल मालक व चालक हजर होते.





प्रेसनोट दि.१३/०४/२०१९

**सिंहगडरोड पो.ठाणे**

## कम्युनिटी पोलीसींगचे अनुषंगाने जेष्ठ नागरीकांची बैठक घेवुन जनजागृती

दि. १२/०४/२०१९ रोजी सायंकाळी १७.३० वा. १८.३० वा. चे दरम्यान बी.डी.साळुंखे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, सिंहगडरोड पोलीस ठाणे सोबत पोलीस नाईक १२७६ प्रसाद टापरे यांचेसह वडगाव कॅनॉल ते हिंगणे दरम्यान वॉकींगट्रॅक या भागात पायी गस्त करुन वॉकींग करीता आलेल्या १५ ते २० जेष्ठ नागरीकांची भेट घेवुन त्यांच्या दैनंदिन अडचणींबाबत त्यांच्याशी चर्चा करुन योग्य ते मार्गदर्शन केले. पुणे पोलीस आयुक्तालयाकडून कम्युनिटीं पोलीसींग संदर्भात एकुण १४ ॲप/योजना कार्यान्वीत असून त्या संदर्भात तसेच इतर जेष्ठ नागरीकांच्या अडचणी असल्यास त्यांना त्वरीत सिंहगडरोड पो.स्टे. अथवा १०० नंबरवर कॉल करुन पोलीस कंट्रोल रुम येथे कळविण्याबाबत योग्य त्या सुचना दिलेल्या आहेत. तसेच जेष्ठ नागरिकांसाठी असणारी हेल्पलाईन नं. १०९१ बाबत जेष्ठ नागरीकांना माहिती दिली.





